REGISTERED No. B. 3434




# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख ४ फेब्रुवारी १९४८ अंक ५

अर्थ

बुधवार, ता. ४ फेब्रुवारी १९४८



प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद् वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.

# महात्मा गांधी



महात्मा गांधी ह्यांच्या अत्यंत दुःखद निधनाची वार्ता शुक्रवार ता. ३० रोजींच सर्वत्र पसरली आणि ह्या घटनेमुळें सर्वांस फारच मोठा धक्का बसला. महात्माजींच्या मृत्यूइतकाच, किंवा त्याहूनहि अधिक, ज्या प्रकारानें त्यांस मृत्यु आला तो प्रकार खेदजनक आहे. महात्माजींच्या देहावसानाचा विचार करतां, आपल्या क्षुद्रत्वाचीच अधिकाधिक जाणीव होत जाते. त्यांच्या जागतिक कार्याचें आकलनहि होऊं शकणार नाहीं. अशीच सर्वसामान्य हिंदी मनुष्याची परिस्थिति आहे, आणि त्यांच्या कामगिरीचा परामर्श घेण्याचा प्रयत्न आज करण्याजोगी मनःस्थितिहि नाहीं. भविष्यकाळाकडेच दृष्टि खिळून राहत आहे. केवळ हिंदीच नव्हे, तर जगांतील सर्वच त्रस्त लोकांमध्यें आत्मविश्वास निर्माण करून त्यांचा उद्धार घडवून आणण्याचें इतिहासांत अतुल असें प्रचंड कार्य महात्माजींनीं यशस्वी रीतीनें पार पाडलें आहे. त्यांच्या आदर्शाप्रमाणें हिंदी नागरिकांनीं कार्य चालविण्यानेंच ह्या महान राष्ट्रपित्याविषयीं खरी कृतज्ञता व्यक्त होणार आहे.

हिंदी राष्ट्रीय सरकारास व पुढाऱ्यांस हिंदी जनतेनें एकदिलानें पाठिंबा द्यावा व आपलें राष्ट्र बलवान् करण्यासाठीं सर्वांनीं प्रयत्नांची शिकस्त करावी; सरकारच्या मार्गांत निष्कारण अडथळे आणणें आज घातुक ठरेल, एवढें स्पष्ट करणें येथें आवश्यक आहे. ही सुबुद्धि सर्वांस होवो. महात्माजींच्या त्यागाचीं फळें चाखण्यास आवश्यक, एवढे तरी राष्ट्रीय गुण आमच्यांत दृढमूल होवोत.

# विविध माहिती

**हिंदुस्थानांतील पेट्रोलचें उत्पादन**—हिंदुस्थानांत आज पेट्रोल वांटप पद्धतीनें दिलें जातें. पेट्रोलचा आजचा खप वार्षिक ३० लाख टन असून त्यापैकीं फक्त ७ टक्के हिंदुस्थानांत उत्पादन केलें जातें. युद्धापूर्वी हिंदुस्थानांत वांटप-पद्धति नव्हती. तेव्हा २० लाख टन पेट्रोल खपत असे. चालू वांटप पद्धति बंद केली तर हा खप ४० लाख टनांपर्यंत जाईल. युद्धापूर्वी हिंदुस्थानच्या गरजेपैकीं ३५ टक्के पट्रोल ब्रह्मदेशांतून येत असे, ४ टक्के आजच्या पाकिस्तानमधील प्रांतांतून येत असे, ९ टक्के स्थानिक उत्पादन होत असे व बाकीचें परदेशांतून येत असे.

**मजूर उमेदवाराची हार**—ब्रिटनच्या पार्लमेंटची १९४५ सालीं सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर एकंदर ३५ जागांसाठीं फेर निवडणुका झाल्या. त्यांपैकीं २२ जागांसाठीं पुन्हां मजूर सभासदच निवडून आले. परंतु नुकत्याच झालेल्या एका फेर निवडणुकींत मात्र हजूर पक्षीय उमेदवाराला ३९५ मतें जास्त पडून तो निवडून आला. मजूर पक्षीय सभासदाला १०,६९० मतें पडलीं. अजून तीन मतदार संघांतर्फे फेर निवडणुका व्हावयाच्या आहेत.

**दारूबंदीमुळें १७ कोटींची घट**—मद्रास प्रांतांत सार्वत्रिक दारूबंदी करण्याच्या सरकारच्या धोरणामुळें मद्रास सरकारचें वार्षिक १७ कोटी रुपयांचें अबकारी उत्पन्न बुडणार आहे. येत्या ऑक्टोबर पासून मद्रास प्रांताच्या उरलेल्या ८ जिल्ह्यांतून करण्यांत येणाऱ्या दारूबंदीमुळेंच ३ कोटी २५ लाखांची तूट येणार आहे.

**औद्योगिक उत्पादनांत घट**—इंडिअन मर्चंटस् चेंबरचे मावळते अध्यक्ष श्री. रतिलाल शहा ह्यांनीं संस्थेच्या वार्षिक साधारण सभेंत असे उद्गार काढले कीं, देशांतील आर्थिक आणि औद्योगिक संघटनेला चांगली चालना मिळावयाची असेल तर खाजगी उद्योगधंद्यांना योग्य ती संधि भरपूर प्रमाणात देण्याचें अधिकृत आश्वासन मिळणें जरूर आहे. संस्थेचे नवे अध्यक्ष श्री. रामदास किलाचंद ह्यांनीं औद्योगिक उत्पादनांत पुढील प्रमाणें घट झाल्याचे सांगितलें. तागाचें उत्पादन १९३८ पेक्षा १,७९,४०० टनांनीं कमी झालें आहे. पोलाद १२,६०,००० टन उत्पादन करणें शक्य आहे. पण १९४७ सालीं अंदाजें उत्पादन ८,७५,००० टनच झालें. सिमेंटचें उत्पादन दरमहा १,७३,००० टन शक्य आहे. पण प्रत्यक्ष उत्पादन अंदाजें, १,१२,००० टनच होतें. कागदाच्या उत्पादनाची शक्यता वार्षिक, १,१०,००० टन असतां प्रत्यक्ष उत्पादन फक्त ८६,००० टनच झालें.

**राजीनाम्याची बातमी खोटी**—रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर चिंतामण देशमुख ह्यांनीं राजीनामा दिल्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. पण ती निराधार असल्याचें खुद्द त्यांनींच जाहीर केलें आहे.

**खाणींसाठीं स्वतंत्र संस्था**—हिंदुस्थानांतील खाणींच्या वृद्धी व विकासासाठीं हिंदुस्थान-सरकारनें नॅशनल ब्यूरो ऑफ माइन्स ह्या नांवाची एक संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. खनिज संपत्ति बाबत एकसूत्री धोरण ठेवण्याचेंहि कार्य ह्या संस्थेनें करावयाचें आहे. संस्था इंग्लंड–अमेरिकेंतील संस्थांच्या धर्तीवर संघटना करण्यांत येणार असून प्रारंभीं तिच्यासाठीं ३ लाख रुपये वार्षिक खर्च येईल. सध्यां खाणी उघडणें अगर चालविणें, अगर खनिजें विकणें हीं कामें संस्था करणार आहेत. सल्लामसलत देण्याचेंच तूर्त संस्थेचे काम आहे संस्थेचें काम एक तज्ज्ञ भूस्तर शास्त्रज्ञ अगर माइनिंग एंजिनिअर पहाणार आहे.

**रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयीकरण**—रिझर्व्ह बँकेचें येत्या सप्टेंबर-नंतर राष्ट्रीयीकरण करण्याचा निश्चय हिंदुस्थान सरकारनें जाहीर केला आहे. इंपीरिअल बँकहि मागोमाग सरकारी मालकीची होईल. मार्च १९४७ ते सप्टेंबर १९४८ ह्या मुदतीमधील शेअर्सच्या सरासरी किंमतीइतकी किंमत ३% रोख्यांचे स्वरूपांत भागीदारांस सरकार देईल, असें समजतें. इतर बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा सरकारचा तूर्त तरी विचार नहीं.

**डिस्कौंट बँक ऑफ इंडिया लि. ला ठेवी घेण्याची बंदी**—डिस्कौंट बँकेवर हुकूम बजावून, तिला २ फेब्रुवारी नंतर ठेवी घेण्यास हिंदुस्थान सरकारनें, रिझर्व्ह बँकेच्या सूचनेस अनुसरून बंदी केली आहे.

**कोणतेंहि कापड कितीहि घ्या**—हिंदुस्थान सरकारच्या निर्णयास अनुसरून, मुंबई सरकारनें लादलेलीं कापडावरील सर्व नियंत्रणें प्रांतिक सरकारनें दूर केलीं आहेत. कापडाचें रेशनिंग आतां अमलांत नाहीं. कापडाची कोठेंहि खरेदी करावी, कोठेंहि त्याची वहातुक करावी व कोठेंहि तें विकावें. कापड-विकण्यास अथवा साठविण्यास परवाना आवश्यक नाहीं. सुतावरील नियंत्रणें मात्र कायम आहेत.

---

### पोलादाची किंमत टनामागे ८० रुपयांनीं वाढली

टाटा कंपनीनें व स्टील कॉर्पोरेशन ऑफ बेंगॉलनें १ एप्रिल १९४६ रोजीं आपल्या किंमती दर टनास १२ रु. ८ आ. कमी केल्या जाण्यास मान्यता दिली, परंतु बिझिनेस प्रॉफिटस् टॅक्स, कॉर्पोरेशन टॅक्समध्यें वाढ, मजुरी आणि कच्चा माल ह्यांच्या किंमती वाढल्यामुळें उत्पादन खर्चांत वाढ, इत्यादि कारणांमुळें ह्या कंपन्यांवरील देण्यांच्या जबाबदारींत बरीच भर पडली आहे. उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होऊं नये, ह्यासाठी कंपन्यांस कांहीं मदत तात्काळ मिळणें आवश्यक आहे. टारिफ बोर्डानें ह्या प्रश्नाचा विचार करून पोलादाच्या किंमती ठरविण्यास वेळ लागेल; तेव्हां तात्कालिक योजना म्हणून वरील १२ रु. ८ आ. ची कपात दूर करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. रेल्वे वहातुकीचे दरामुळें उत्पादकांस दर टनास ११ रु. जादा खर्च येईल; म्हणजे उत्पादकांना दर टनामागें २३ रु. ८ आ. मिळतील.

ग्रेट ब्रिटन व अमेरिका देशांकडून कांहीं विशिष्ट प्रकारचें पोलाद सरकार आयात करणार आहे, परंतु ह्या पोलादाची किंमत हिंदी पोलादाच्या किंमतीपेक्षां २००% अधिक भरेल. ही जादा किंमत सर्वच ( हिंदी व आयात होणाऱ्या ) पोलादावर विभागली जावी आणि हिंदी उत्पादकांना दर टनास हल्लीपेक्षां २३ रुपये ८ आ. जास्त मिळावे ह्यासाठी गिऱ्हाईकांस पडणारी किंमत टनास ७५ रुपयांनीं वाढविण्यांत आली आहे. त्यांत बिहार सेल्स टॅक्सचे ५ रु. मिळवले, म्हणजे किंमत ८० रुपयांनीं प्रत्यक्ष वाढलेली आढळून येईल.

### समाधान

धनतोली, नागपूर, येथें श्री. श्री. ना. बनहट्टी ह्यांच्या संचालकत्वाखालीं आणि श्री. व. शा. वरखेडकर ह्यांच्या कार्यकारी संपादकत्वाखालीं हें साप्ताहिक जानेवारी १९४८ मध्यें सुरू झालें आहे. जीवनाच्या सर्व बाजूंना योग्य तें महत्त्व देण्यास आपण शिकलें पाहिजे, हा "समाधाना" चा उद्देश सध्यांच्या परिस्थितींत अत्यंत स्वागतार्ह आहे. अशा तऱ्हेच्या साप्ताहिकांची उत्कृष्ट नागरिक तयार करण्याचे कामीं महत्त्वाची कामगिरी होण्याजोगी आहे, ह्या दृष्टीनें ह्या नव्या व्यवसायबंधूचें आम्हीं अंतःकरणपूर्वक स्वागत करतों. ( वा. वर्गणी : ६ रु. )

## मध्यवर्ती प्लॅनिंग कमिशनची नेमणूक

### जनतेच्या आर्थिक प्रगतीसाठीं नेहरू समितीच्या अनेकविध सूचना

ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें पं. जवाहारलाल नेहरू ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक आर्थिक कार्यक्रम समिती नेमली होती, तिच्या बैठकी गेल्या महिन्याचे अखेरीस भरून तिनें आपला अहवाल काँग्रेसचे अध्यक्ष, बाबू राजेंद्र प्रसाद, ह्यांस सादर केला आहे. कमिटीच्या बैठकीस पं. नेहरू, मौलाना आझाद, डॉ. जॉन मथाई, श्री. शंकरराव देव, प्रो. रंगा व श्री. कुमारप्पा हे उपस्थित होते. सरकारचें धोरण अंमलांत आणण्याचे कामीं त्यास सल्ला देण्यासाठीं एक कायम मध्यवर्ती प्लॅनिंग कमिशन नेमण्यांत यावें, अशी समितीची एक महत्त्वाची शिफारस आहे. सध्याची कर पद्धति, परराष्ट्रीय व्यापाराचें स्वरूप, परदेशी भांडवलाचें हिंदी आर्थिक प्रगतीचे कार्यातील स्थान, इत्यादि प्रश्न ह्या कमिशनचे कक्षेत येतील.

कार्यक्रमाचें उद्दिष्ट खालीलप्रमाणें नमूद करण्यांत आलें आहे. (१) जनतेच्या रहाणीच्या दर्जांत त्वर व प्रगतिपर वाढ; त्यासाठी उत्पादनांत सुधारणा. (२) किमान राष्ट्रीय उत्पन्नाची शाश्वती. राष्ट्रीय उत्पन्नाशीं योग्य प्रमाणांत वैयक्तिक कमाल उत्पन्नाची रकम ठरविणें. (३) सध्याच्या संपत्तीची वाजवी वाटणी. औद्योगीकरणाबरोबर आर्थिक विषमता वाढूं न देण्याची खबरदारी. धंद्यांत सर्वांना योग्य तो वाव. नागरी व खेडेगांवी आर्थिक संसारांत समतोलपणा. वरील उद्दिष्टें साध्य करण्यासाठी समितीनें अनेक तपशीलवार सूचना केल्या आहेत.

---

**लाहोरमध्यें बँकांच्या कारभारास पुनः प्रारंभ**—लाहोरमधील बँकांस लवकर आपले व्यवहार पुनः सुरू करतां यावे ह्यासाठी बँकांच्या बिगर-मुसलमान नोकरांची संरक्षणाची व रहाण्याची व्यवस्था पश्चिम पंजाब सरकार करणार आहे. बँकांच्या खर्चानें बँकांसाठी संरक्षकहि पुरविले जातील. कांहीं कारणामुळें बँकांना आपल्या शाखा चालू ठेवणें शक्य होत नसेल, तर त्यांना प. पंजाबचें सरकार चौकशी करून तशी परवानगी देईल. निर्वासित ठेवीदारांच्या, बँकांविरुद्ध बऱ्याच तक्रारी ( उ. खात्यांची वर्गावर्गी करण्यांत चुकारपणा, जुने कोरे चेक परत न केल्याबद्दल ठेवीची रकम देण्यास नकार, इ. ) आहेत, त्या दूर करण्याचा यत्न केला जाईल.

**कटक रेडिओ स्टेशन**—ओरिसा प्रांतांतील कटक येथील रेडिओ स्टेशन ता. २८ रोजीं सुरू झालें.

**हिंदुस्थानसाठीं जर्मन तज्ज्ञ**—हिंदी उद्योगधंद्यांचा विस्तार करण्यासाठी आणि हिंदी कामगार तयार करण्यासाठीं कांहीं जर्मन तज्ज्ञ हिंदुस्थानांत आणण्यांत येणार आहेत. बर्लिनमध्यें असलेल्या हिंदी लष्करी मंडळाच्या आर्थिक सल्लागारानें ही बातमी जाहीर केली आहे.

**मद्रासमधील जमीनदारी**—मद्रास प्रांतांतील जमीनदारी नष्ट करण्यासंबंधींचें बिल दोन्ही सभागृहांच्या सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्यांत आलें आहे. इनामदारांना योग्य ती नुकसानभरपाई देऊन इनामी जमिनींना सुद्धा रयतवारी सारा देण्याची पद्धत लागूं करण्याची सोय बिलांत करण्यांत आली आहे. सरकारला नुकसान भरपाईसाठीं १० कोटी रुपये द्यावे लागतील; आणि सरकारच्या जमीन महसुलांत १ कोटीची वार्षिक भर पडेल असा अंदाज आहे.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन

### मूळ बिलांत सिलेक्ट कमिटीनें सुचविलेल्या सुधारणा

**भाग भांडवल**:—कॉर्पोरेशनच्या भाग भांडवलांत ५ कोटींची वाढ करून तें १० कोटी रुपये करण्यांत आलें आहे. त्याची वाटणी प्रत्येकीं ५,००० रुपयांच्या २०,००० पूर्ण भरलेल्या शेअर्स-मध्यें केली जाईल. प्रारंभीं ५ कोटींचेंच भांडवल विक्रीस काढलें जाईल. सहकारी बँकांसाठी कॉर्पोरेशनचे १,००० शेअर्स (म्हणजे ५० लक्ष रुपयांचें भांडवल) राखून ठेवण्यांत येतील.

**धोरणविषयक अधिकार**:—कॉर्पोरेशनचें बोर्ड धोरणाचे बाबतींत मध्यवर्ती सरकारचा सल्ला मानील; परंतु एखादा प्रश्न धोरणाचा आहे किंवा नाहीं ह्या विषयीं सरकार व कॉर्पोरेशनचें बोर्ड ह्यांचेमध्यें वांधा आल्यास त्या विषयीं सरकारचा निर्णय बंधनकारक ठरेल. सरकारनें आखून दिलेलें धोरण बोर्डानें मानलें नाहीं तर सरकार बोर्डाच्या निर्णयास बाजूस सारील. डायरेक्टरांपैकीं कांहीं सरकारी व कांहीं भागदारांनीं निवडलेले असतील. त्यांची निवडणूक चार वर्षांकरितां होईल व पाळीपाळीनें ते सेवानिवृत्त होतील.

**मुख्य कचेरी**:—कॉर्पोरेशनची मुख्य कचेरी दिल्ली येथें रहावी व तिची एक शाखा-कचेरी कानपुरास असावी अशीहि सिलेक्ट कमिटीची शिफारस आहे.

**कर्जरोखे व डिबेंचर्स**:—कॉर्पोरेशन, स्वतःचें वसूल भांडवल व रिझर्व्ह फंड ह्यांच्या पांच पटीइतक्या रकमेचे कर्जरोखे व डिबेंचर्स काढूं शकेल. त्यांवरील किती व्याजाची हमी सरकार देणार हें तीं विक्रीस काढण्याचे वेळीं सरकार जाहीर करील.

**कर देण्याचें बंधनः**—कॉर्पोरेशननें इतर कंपन्यांप्रमाणेंच इनकमटॅक्स व सुपरटॅक्स सरकारास भरावयाचा आहे.

---

**खेळाडूंसाठीं खास खुराक**—ब्रिटनमध्यें १९४८ सालीं भरणाऱ्या ऑलिंपिक सामन्यांत भाग घेणाऱ्या खेळाडूंना अमेरिका ३०० टन अन्न-पदार्थांची मदत देणार आहे असें समजतें. ह्या सामन्यासाठीं सर्व जगांतून सुमारें ६,००० खेळाडू येणार आहेत. त्यांच्यासाठीं अमेरिका मांस, अंडीं व अन्नधान्यें पाठविणार आहे. ह्या अन्नवस्तूंची वाहतूक करण्यासाठीं बोटी राखून ठेवण्यांत आल्या आहेत. अमेरिकन सरकारची संमति मिळण्याचाच काय तो अवकाश आहे.

**प्रवासावरील निर्बंध ढिले झाले**—परदेशीं प्रवास करण्यासंबंधीं ब्रिटिश सरकारनें जे कडक निर्बंध घातले होते, त्यामुळें ब्रिटिश नागरिकांना मौजेनें परदेशीं प्रवास करणें अशक्यच झालें होतें. तथापि ता. १ मे, १९४८ पासून कांहीं विवक्षित देशांतून प्रवास करण्यासंबंधींचे नियम ढिले करण्यांत येणार आहेत. त्यामुळें मोठ्या माणसांना वार्षिक ५० पौंडांऐवजीं ३५ पौंड, आणि मुलांना वार्षिक २५ पौंड एवढी रकम परदेशीं खर्च करता येईल. ह्या रकमेंत प्रवासाचा खर्च धरलेला नाहीं. प्रवास करण्याची परवानगी असलेल्या देशांची यादी मार्चमध्यें जाहीर होणार आहे.

**मद्रास प्रांतांत शंभर टक्के दारूबंदी**—ता. १ ऑक्टोबर १९४८ पासून मद्रास प्रांतांतील उरलेल्या ८ जिल्ह्यांतूनहि दारूबंदी करण्यांत येणार आहे. खुद्द मद्रास शहरही दारूबंदीच्या क्षेत्रांत समाविष्ट करण्यांत येईल. मद्रास असेंब्ली काँग्रेसपक्षानें २ वर्षांपूर्वी निर्णय घेतल्याबरहुकूम १९४८ साल संपण्यापूर्वी मद्रास प्रांत दारू-विना कोरडा करण्याचा हा प्रयत्न आहे.

<u>पुणें सें. को. बँकेचा सहकारी सप्ताह</u>

व्याख्यान ४ थें, ता. २९-१०-४७

## शेतकऱ्यांच्या पतींची पुनर्रचना

### ( श्री. दा. वा. पोतदार )

व्याख्यात्यांनीं गाडगीळ कमिटी व सरय्या कमिटी यांची स्थूल मानानें माहिती सांगून त्यांनीं केलेल्या वेगवेगळ्या सूचना व शिफारसी सभेस निवेदन केल्या. गाडगीळ कमिटीची मुख्य शिफारस अशी आहे कीं, हिंदुस्थानांतील पतवान शेतकऱ्यास शेतीचा धंदा चालविण्यासाठीं व इतर गरजा भागविण्यासाठीं त्यास त्याच्या परतफेडीच्या ऐपतीच्या मानानें कर्ज मिळण्याची व्यवस्था व्हावयास पाहिजे. हे शेतकरी सहकारी सोसायट्यांचे सभासद असले वा नसले तरीही त्यांची गरज भागली पाहिजे. सबब या कामासाठीं एक निमसरकारी संस्था स्थापन होऊन तिचेमार्फत हा व्यवहार व्हावा. मात्र ज्या प्रांतांत सहकारी चळवळ बरीच वाढली आहे तेथील प्रांतिक सरकारास असें योग्य वाटल्यास हें काम सहकारी संस्थांमार्फत करून घेण्यास हरकत नाहीं. सबब मुंबई सरकारनें आपणास योग्य वाटेल त्या दृष्टीनें ही व्यवस्था करावी.

सरय्या कमिटीची मुख्य शिफारस अशी आहे कीं, खेड्यांतील जनतेचा सर्व कारभार सहकार्याच्या जोरावर व मदतीनें चालल्याशिवाय तिची उन्नति होणें कठीण आहे. सबब पुढील दहा वर्षांत राष्ट्रांतील निदान शेकडा ५० व्यक्तींत आणि शेकडा ३० खेड्यांत सहकाराचा प्रसार होईल असें निश्चित धोरण वेगवेगळ्या सरकारांनीं आखावें आणि शेतकऱ्याचे सर्व आर्थिक व्यवहार सहकारी सोसायट्यांमार्फतच होतील अशी व्यवस्था करण्यांत यावी.

गाडगीळ कमिटीचे दृष्टया, सहकारी चळवळीचा आजवर झालेला विस्तार लक्षांत घेता सर्व पतवान शेतकऱ्यांस कर्ज मिळण्याची व्यवस्था सहकारी सोसायट्यांमार्फत होणें अवळजवळ अशक्य आहे; सबब हें काम सरकारनें स्वतः अगर सरकार-पुरस्कृत स्वतंत्र अशा एका संस्थेमार्फत करण्यांत यावें.

सरय्या कमिटी मात्र या सूचनेशीं सहमत होऊं शकत नाहीं. उलट, ही व्यवस्था सहकारी सोसायट्यांमार्फतच करण्यांत यावी असा तिचा आग्रह आहे.

मुंबई सरकारनें या दोन्ही अहवालांचे शिफारसींचा विचार करून सरकारनें या प्रकरणीं किती व कोणती मदत देणें इष्ट व योग्य आहे वगैरे बाबींवर सल्ला देण्याचे दृष्टीनें सर मणीलाल नानावटी यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमली असून गाडगीळ कमिटीच्या शिफारसी मुंबई प्रांतांत सहकारी संस्थांमार्फत अमलांत आणण्याचे दृष्टीनें सदर संस्थांस कोणती मदत (आर्थिक व इतर) केली पाहिजे, तसेंच त्यांच्या व मध्यवर्ती सहकारी संस्थांच्या घटनेंत कोणते फेरफार केले पाहिजेत ते सुचविण्याची सदर समितीकडे कामगिरी सोपविली आहे. या समितीचा अहवाल सरकारकडे सादर झाला असून तो लौकरच प्रसिद्ध होईल असें कळतें.

गाडगीळ कमिटीच्या शिफारसी सहकारी संस्थांमार्फत पार पाडणें असेल तर त्यासाठीं कोणत्या गोष्टी घडणें आवश्यक आहे व सरकारी मदत किती व कशा प्रकारें लागेल याचा त्यांनीं उहापोह केला. कर्ज व्याजाचे दरही आज आहेत तसेच ठेवावे लागतील. ६½ व ४% या शिफारसीप्रमाणें ते होणें कठीण आहे हें साधार दाखविलें. प्रांतिक व जिल्हा बँकांचे घटनेंत किती व कसा बदल करावा लागेल व शेतकी सोसायट्यांचीहि घटना व कार्यपद्धति कशी बदलावी लागेल हेंहि सांगितलें. सरकार ज्या प्रमाणांत प्रत्यक्ष मदत करील त्या प्रमाणांतच यश मिळेल, असें त्यांनीं सांगून आपलें भाषण संपविलें.

## पुढील हंगामासाठीं बियाणें राखून ठेवा

### शेतकऱ्यांना मुंबई सरकारची सूचना

गेलीं दोन-तीन वर्षें पीक वाईट येत असल्यामुळें सरकार आपल्या सांठ्यांतून बियाण्यांसाठीं जरूर तेवढें धान्य वेगळें काढून राखून ठेवीत असे. शेतकऱ्यांकडून सरकार जी धान्यवसुली करीत असे, त्यांतून हें बियाणें काढून ठेवण्यांत येत असे. परंतु आतां अन्न-धान्यावरील नियंत्रणें सरकारनें काढून टाकली आहेत आणि त्याबरोबर धान्यवसुलीहि बंद झाली आहे. तेव्हां सरकारजवळ धान्याचा सांठा नसल्यामुळें येत्या हंगामांत सरकारला पेरणीसाठीं बियाणें पुरवितां येणार नाहीं.

गेला खरीप हंगाम चांगला होता. तेव्हां शेतकऱ्यांना येत्या हंगामांतील पेरणीसाठीं जरूर तेवढें बियाणें राखून ठेवतां येईल असें सरकारला वाटतें.

अर्थात, आगामी हंगामांत पेरणीसाठीं बियाणें पुरविण्याची जबाबदारी सरकार आपल्या शिरावर घेणार नाहीं. शेतकऱ्यांनीं स्वतःच पुढच्या पेरणीसाठीं पुरेसें बियाणें राखून ठेवावें असें सरकार त्यांना कळवूं इच्छितें.

निरनिराळ्या सरकारी संशोधन-केंद्रांत व शेतांत तयार होणाऱ्या विविध प्रकारच्या सुधारलेल्या बियाणांचा पुरवठा व वांटणी करण्याचे काम मात्र सध्याप्रमाणें शेतकी खात्याकडून यापुढेंहि चालू राहील.

---

### हिंदुस्थान सरकारची काटकसर कमिटी

हिंदुस्थान सरकारनें एक काटकसर कमिटी नेमली आहे, तिचा उद्देश सरकारच्या वेगवेगळ्या खात्यांच्या खर्चाची छाननी करून काटकसर सुचविणें हा आहे. युद्धकाळांत खर्चांत भरमसाट वाढ होत गेली, त्याला आळा घालण्यास कोणासच सवड नव्हती व तिकडे कोणाचेंहि लक्ष नव्हतें. स्वतंत्र हिंदुस्थानच्या सरकारास आतां राष्ट्रोद्धारक योजना हातीं घेऊन त्या पार पाडावयाच्या आहेत, हें लक्षांत घेऊन शास्त्रशुद्ध पहाणी करण्याचें काम कमिटीकडे सोपविलेलें आहे. कमिटीचें काम अगदी त्वरेनें पुरें व्हावें अशी सरकारची इच्छा आहे व जसजसें काम पुरें होत जाईल तसतसा रिपोर्ट कमिटीनें सरकारकडे सादर करावयाचा आहे. म्हणजे, त्याच्या अंमलबजावणीस विलंब लागणार नाहीं. अहमदाबादचे शेठ कस्तुरभाई लालभाई हे कमिटीचे अध्यक्ष आहेत.

---

### मुलांचा खाऊ

नॅशनल प्रॉडक्टस् कराड, या नांवानें श्री. कृष्णराव सरडे यांनीं कराड येथें, मुलांचा खाऊ बनविण्याकरितां दोन वर्षांपूर्वी अगदीं लहान प्रमाणावर कारखाना काढला होता. त्यावेळीं कारखान्यांत अवघीं दहा बारा माणसें असून सुद्धां चांगला माल काढण्याचा श्री. सरडे यांनीं खूप प्रयत्न करून यश व विश्वास संपादन केला. आतां कारखान्याची मालकीची जागा व इमारत असून पूर्वीपेक्षां चौपट माणसें काम करीत आहेत. मालास बाजारांत बरीच मागणी असल्यानें व साखरेवरील नियंत्रण उठल्यामुळें भरपूर माल निघण्याकरितां, उपकरणी व भट्ट्या हीं नविन पद्धतीचीं आणविण्याची खटपट चालू आहे.

## सहकारी गृहमंडळ्यांचे पुरस्कर्ते
## के. रा. ब. तालमाकी

सुप्रसिद्ध सहकारी कार्यकर्ते रावबहादुर एस. एस. तालमाकी, बी. ए., एलएल बी. हे धारवाड येथें बुधवार, ता. २८ रोजीं मृत्यु पावले, हें नमूद करण्यास दुःख होतें. त्यांचा जन्म १८७० सालीं झाला. ते मुंबई हायकोर्टाचे सेवानिवृत्त असिस्टंट रजिस्ट्रार होते. १९०६ सालीं त्यांनीं शामराव विठ्ठल को. बँकेच्या स्थापनेंत पुढाकार घेतला आणि तिचे ते दीर्घकाळ चेअरमन होते. मुंबईमधील सहकारी हौसिंग चळवळीचे ते एक जनक होते, आणि पहिली हौसिंग सोसायटी—सारस्वत को. हौसिंग सोसायटी त्यांनीं १९१५ मध्यें स्थापन केली. मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या स्थापनेपासून म्हणजे १९१८ पासून १९३३ अखेर ते तिचे ऑनररी सेक्रेटरी होते. त्यांनीं सहकारी विषयावर बरेंच वाङ्मय प्रसिद्ध केलें, त्यांत "कोऑपरेशन इन इंडिया अँड अब्रॉड" हा त्यांचा ग्रंथ अद्यापहि आधारभूत मानला जातो.

---

**रशिअन अर्थशास्त्रज्ञ बडतर्फ?**—मार्शल स्टॅलिन ह्यांचे खाजगी आर्थिक सल्लागार प्रो. व्हार्गा ह्यांना जागतिक राजकारण व अर्थकारण ह्या विषयाच्या रशियांतील विद्यापीठाच्या संचालकत्वावरून दूर करण्यांत आलें आहे असें समजतें. प्रो. व्हार्गा ह्यांनीं अँग्लो-अमेरिकन गटाशीं सहकार्य प्रतिपादन करणारें पुस्तक लिहिल्याबद्दल त्यांच्यावर हा प्रसंग आला असें म्हणतात. तथापि रशियांत प्रो. व्हार्गा ह्यांच्यावर झालेल्या टीकेचें स्वरूप वेगळ्या प्रकारचें होतें. प्रो. व्हार्गा ह्यांनीं भांडवलदारी राष्ट्रांतील चलनवृद्धीकडे यावें तितकें लक्ष दिलें नाहीं अशी ही टीका होती.

**बँकेस ठेवी घेण्यास बंदी**—कलकत्ता येथील म्युच्युअल बँकिंग कॉर्पोरेशन लि. वर हिंदुस्थान सरकारनें हुकूम बजावून नव्या ठेवी घेण्यास बंदी केली आहे. सरकारनें बँकेची रिझर्व्ह बँकेकरवीं तपासणी करविली आणि त्या तपासणी रिपोर्टाचा विचार करून ठेवीदारांच्या हितासाठी वरील हुकूम काढला.

**हिंदुस्थानांतील युरोपियनांचे पेन्शनचे हक्क**— हिंदुस्थानचे माजी व्हाइसरॉय, लॉर्ड वेव्हेल, ह्यांनीं ब्रिटिश लॉर्डांच्या सभेंत पहिला प्रश्न विचारला, तो हिंदुस्थानांतील युरोपियनांच्या पेन्शनाबाबत होता. कित्येक युरोपियन सैनिकांनीं आपला लष्करी दर्जा सोडून बिनलष्करी दर्जाचें कारकुनीचें काम पत्करलें; परंतु त्यांस पुनः लष्करांत घेतलें जात नाहीं. त्यामुळें त्यांचा नुकसानभरपाईचा हक्क नष्ट झाला आहे, ह्या गोष्टीकडे लॉर्ड वेव्हेल ह्यांनीं ब्रिटिश सरकारचें लक्ष वेधलें.

**पाकिस्तानासाठी कराची पब्लिक डेट ऑफिस**—कराची येथें एक नवें पब्लिक डेट कचेरी लवकरच स्थापन केली जाईल. पाकिस्तानांतील प्रांतिक सरकारांचीं कर्जविषयक सर्व कामें त्या कचेरीकडे वर्ग केलीं जातील. सिंध, सरहद्द प्रांत व प. पंजाब ह्या प्रांतांच्या सरकारी कर्जाचें काम सध्यां मुंबई येथील पब्लिक डेट ऑफिस पहात आहे, तें ह्यापुढें कराची येथील कचेरी पाहूं लागेल. रोखे धारण करणारांनीं रोख्यांसंबंधीं कामें आतां कराचीस पाठवावीं. व्याज मुंबईस पूर्वीप्रमाणेच मिळूं शकेल.

**५० लाखांची सरकारी ग्रँट**—मुंबई म्युनिसिपॅलिटीच्या १९४८-४९ च्या अंदाजपत्रकांतील तूट भरून काढण्यासाठी मुंबई सरकार ५० लक्ष रुपयांची मदत करणार आहे.

**पुना केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड**

सदर कंपनीचा मोठ्या प्रमाणावर शेतीस लागणारीं खतें तयार करण्याचा कारखाना लोणंद (एम. एस. एम. रेल्वे) येथें लौकरच सुरू होणार आहे. या कारखान्यांत शेतीस लागणारीं रासायनिक आधुनिक खतें, बोनमील, सुपरफॉस्फेट, एरंडी, शेंगदाणा पेंड, पिकावरील कृमिनाशक पावडर्स व शुद्ध तेलें, साबण वगैरे जिन्नस मोठ्या प्रमाणावर तयार होणार आहेत. शेतकरी, व्यापारी व एजंट्स् यांना कंपनीनें दिलेल्या सवलती फारच आकर्षक आहेत. हीं खतें पूर्ण शास्त्रोक्त पद्धतीनें तयार होणार असून हीं वापरलीं असतां आतां होत आहे त्यापेक्षां दुपटी-तिपटीनें जादा पीक निघतें असें कंपनी जाहीर करीत आहे व याबाबत ते करणार असलेले प्रयोग दाखवून लौकरच खात्री करून देणार आहेत.

कंपनी पब्लिक लिमिटेड आहे. संचालक मंडळांत सासवड येथील लँडलॉर्ड व पुणें जिल्हा स्कूलबोर्ड चेअरमन श्री. डी. के. पुरंदरे, बी. ए., एलएल. बी. वकील हे लाभले आहेत. कंपनीची शेअर विक्री सध्या चालू असून तिला शेतकरी वर्ग व व्यापारी यांचा पाठिंबा मिळत आहे. कंपनी पहिलेच वर्षापासून शेअर होल्डर्सना ६ टक्क्यांवर डिव्हिडंड देण्याचें जाहीर करीत आहे. तरी लहान-मोठे शेतकरी, बागाईतदार, श्रीमंत व सुखवस्तू लोकांनीं कंपनीचे शेअर्स खरेदी करून ह्या नवीन संस्थेस उत्तेजन द्यावें अशी चालकांची विनंति आहे.

**संपामुळें नुकसान**—मुंबई प्रांतांत १९४७च्या चवथ्या सहामाहींत एकूण १५१ संप झाले, त्यांत ९,६५,८५८ कामगारांनीं भाग घेतला. त्यामुळें कामाचे एकुण ६९,८५,९९१ दिवस वाया गेले. १९४६ सालीं ह्याच मुदतींत १११ संप होऊन त्यांत १,१०,०९६ कामगारांचे ५३,६१,८०० दिवस वाया गेले होते.

**बॅरिस्टरी करणार**—हिंदुस्थानांत व पाकिस्तानांत नोकरी करणाऱ्या सुमारें ४० इंग्रज न्यायाधिशांना नोकरी सोडावी लागली आहे. ह्यांबाबत मुंबई हायकोर्टाचे माजी सर न्यायाधीश नुकतेच म्हणाले "दोन्ही नव्या देशांना इंग्रज न्यायाधीश अजूनहि लागतील, ह्या दृष्टीनें आमची व्यवस्था करण्यांत आलेली नव्हती असें आढळतें. आमची ह्यापुढें मुळीच जरूरी नाहीं असें आम्हांस स्पष्ट सांगण्यांत आलें आहे. २०० हिंदी न्यायाधिशांपेक्षा वरच्या जागीं आम्हांस ठेवण्यास हिंदी सरकार तयार नाहीं. मला जगलें तर पाहिजेच; म्हणून मी बॅरिस्टरी करण्यास एप्रिलपासून प्रारंभ करणार आहे."

**बिहार-आसाम जोडणारा रेल्वेचा दुवा**—बिहार व आसाम ह्यांना जोडणाऱ्या रेल्वेचें बांधकाम चालू असून, बहातुकीस दोन वर्षांत प्रारंभ होईल.

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

## औद्योगिक प्रगति आणि आंकडे शास्त्र

इंडिअन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट आणि इंडियन स्टॅंडर्स इन्स्टिटयूशन ह्या संस्थांतर्फे कलकत्ता येथें ता. १० ऑक्टोबर रोजीं एक परिषद् भरविण्यांत येणार आहे. आंकडेशास्त्राच्या अद्यावत् पद्धतींचा उपयोग करून औद्योगिक मालाचें उत्पादन जास्तींत जास्त वाढवावें कसें आणि त्या मालाचा दर्जाही एकसारखा चांगला कसा राखावा, ह्या विषयावर परिषदेंत तज्ञांचीं व्याख्यानें होणार आहेत. हिंदुस्थानांतील तज्ञांबरोबरच न्यूयॉर्क येथील बेल टेलिफोन लॅबोरेटरीजमधील डॉ. वाल्टर शेव्हार्ट हेही आपले विचार परिषदेंत मांडणार आहेत. डॉ.शेव्हार्ट ह्यांनीं अनेक देशांत जाऊन ह्या विषयावर व्याख्यानें दिलेलीं आहेत. ह्या आधुनिक तंत्राचा उपयोग करून अमेरिकेंतील कित्येक कारखान्यांनीं आपलें उत्पादन, मालाचा दर्जा कायम राखून, वाढविलेलें आहे. हिंदुस्थानांत आज नेमक्या ह्याच प्रश्नाला महत्त्व आलेलें आहे. मालाचें उत्पादन जास्तींत जास्त करावयाचें, पण त्याच्या दर्जात कमीपणा येऊं द्यावयाचा नाहीं, असा हा अवघड प्रश्न आहे. औद्योगिक उत्पादनांत ज्या मानवी आणि भौतिक शक्ती अगर वस्तू वापरल्या जातात त्यांच्यावर शास्त्रीय नियंत्रण ठेवल्यानें वरील उद्देश साध्य होतो. अमेरिकेंतील अनुभव असा आहे कीं (१) अशा नियंत्रणामुळें उत्पादनाच्या प्रक्रियेचा आणि कच्चा मालाचा अधिकांत अधिक उपयोग करता येतो, (२) उत्पादनाची किंमत कमी करता येते आणि (३) मालाचें उत्पादन जास्तींत जास्त होऊन त्याचा दर्जाही एकसारखा चांगला राखता येतो. हिंदुस्थानांतील औद्योगिक उत्पादनांत ह्या आधुनिक तंत्राचा उपयोग करूं शकणाऱ्या माणसांची वाण आहे. त्या दृष्टीनें परदेशचा अनुभव लक्षांत घेऊन ह्या नव्या ज्ञानांत तरबेज असणारीं तरुण माणसें मुद्दाम शिकविलीं पाहिजेत. परिषदेनें ह्या महत्त्वाच्या कार्याची प्राथमिक तयारी केली तरी सुद्धा परिषद् यशस्वी झाली असें म्हणता येईल.

---

## साखर कारखान्यांची कार्यक्षमता वाढली पाहिजे.

रा. रा. संपादक, "अर्थ" यांस सा. न. वि. वि.

मागें "टाइम्स ऑफ इंडिया" मध्यें एक पत्र श्री. ए. बी. पांड्या या गृहस्थानीं लिहिलें होतें. त्यांतील सारांश खालीलप्रमाणें होता.

"ब्रिटिश सरकारनें वेस्ट इंडिझ साखरेचा निर्गत दर पौं. २४ शि. ५ वरून पौं. २७ शि. ५, एक टनास याप्रमाणें वाढवला आहे. यावरून पहातां तीन आण्यपेक्षांही १ पौंडास दर कमी पडतो. म्हणजे हिंदी साखर कारखानदाराला याच्या तिप्पट भाव १ पौंड साखर-उत्पादनास लागतो असें उघड आहे."

वेस्ट इंडिझची साखर हिंदुस्थानांत आल्यास इकडल्या कारखान्यांचें काय होईल तें उघडच आहे ! हिंदी साखर कारखानदारांनीं इतर देशांतील उसासारखें उत्पन्न कमी खर्चांत काढल्याशिवाय सरकारनें दिलेल्या सवलतीवरच जगावयाचें म्हटल्यास कठीण जाईल.

अद्यावत् शास्त्रशुद्ध कारखाने उभारल्याशिवाय सध्याचे कारखाने जगांतील स्पर्धेत टिकणें शक्य नाहीं. कळावें, ही विनंति.

२७४, शुक्रवार
पुणें २
२५-१-४७

के. बी. भागवत.
बी. एजी.


# दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

(स्थापना सन १९२७)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,९१,८५० रु. |
| भरलेलें भांडवल | ७४,२७० रु. चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | १००,००० रु. चे वर |
| खेळतें भांडवल | १०,००,००० रु. चे वर |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जे दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदीविक्री व व्याज वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार
या बँकेमार्फत केले जातात.
—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

ना. पां ठाणेदार
मॅनेजर

# दि बँक ऑफ कराड, लि.

कराड (जि. सातारा)

(स्थापना : १२-३-१९४६)

## पहिल्या नऊ महिन्यांतील प्रगति

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल .... | ५,००,००० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल ... | २,५०,००० रु. |
| वसूल केलेलें भांडवल.... | १,२५,००० रु. |
| ठेवी .... | १०,८०,००० रु. |
| एकूण खेळतें भांडवल.... | १२,२२,०१० रु. |

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

म. वि. खंडकर
मॅनेजर

## ब्रिटन-पुरस्कृत तृतीय पंथ

( ग. रा. जो. )

गेल्या महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत ब्रिटिश पार्लमेंटमध्यें परराष्ट्रीय राजकारणावर वादविवाद व चर्चा झाली. मजूर सरकार-तर्फे परराष्ट्रमंत्री मि. बेव्हिन आणि पंतप्रधान मि. ॲटली ह्यांचीं भाषणें झालीं. विरोधी हजूर पक्षातर्फे महत्वाचें भाषण मि. चर्चिल ह्यांचेंच काय तें झालें. मि. बेव्हिन ह्यांनीं आपल्या भाषणांत ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड, बेल्जम व लक्झेंबर्ग इतक्या पश्चिम युरोपांतील राष्ट्रांत आर्थिक ऐक्य प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नाची घोषणा केली. ह्या राष्ट्रांच्या मालिकेंत इटलीही पुढें मागें सामील होण्याची आशा मि. बेव्हिन ह्यांना वाटत असावी. तथापि इटलींत कम्युनिस्ट पक्ष बराच प्रबल असल्यामुळें आणि फ्रान्समधील कम्युनिस्ट-सोशालिस्ट पक्षांत दिसून येणारी दुफळी इटालींत नसल्यानें मि. बेव्हिन ह्यांची आशा कितपत फलद्रूप होईल ह्याविषयीं शंकाच आहे. मि. बेव्हिन ह्यांच्या मतानें पश्चिम युरोप, मध्यपूर्व, आफ्रिका आणि अतिपूर्व ह्या जगाच्या भागांत वसाहती असणाऱ्या पाश्चिमात्य राष्ट्रांनीं सहकार्य करून अमेरिका आणि रशिआ ह्या दोन प्रबल राष्ट्रांच्या कक्षेबाहेर रहावें असें आहे. ह्या प्रयत्नांत यशस्वी होण्याचीही ह्या पाश्चिमात्य राष्ट्रगटाला फारशी आशा नाहीं. कारण, आर्थिक सामर्थ्यांत अमेरिकेशीं हीं राष्ट्रें स्पर्धा करूं शकत नाहींत आणि आज अमेरिका वरील राष्ट्रांच्या आर्थिक साम्राज्यावरच आक्रमण करीत आहे.

ब्रिटननें पुरस्कारलेला हा गट आणि अमेरिका, ह्यांच्यांतील आर्थिक स्पर्धेत वसाहतींतील जनतेचें स्थान काय ? हा प्रश्न पौर्वात्य राष्ट्रांच्या दृष्टीनें अधिक महत्वाचा आहे. मि. बेव्हिन ह्यांच्या भाषणांत वसाहतींचा उल्लेख आला आहे. तो कच्च्या मालाचे व अन्नाचे उत्पादक म्हणून आलेला आहे ही गोष्ट फार सूचक आहे. वसाहतींशीं सहकार्य करून युरोपचे व जगाचेंही कल्याण साधतां येईल असा धूर्त अभिप्राय मि. बेव्हिन ह्यांनीं व्यक्त केला आहे. पण ब्रिटन, फ्रान्स, बेल्जम, हॉलंड, इत्यादि आज दुय्यम प्रतीच्या झालेल्या साम्राज्यशाही राष्ट्रांनीं वसाहतींची औद्योगिक वृद्धी अडवून धरल्याचें प्रसिद्धच आहे. आजही पौर्वात्य राष्ट्रांच्या औद्योगिक विकासाला अनिवार्य तेवढीच मदत करण्याचें धोरण ह्या राष्ट्रांचें दिसून येतें. औद्योगिक क्षेत्रांत जगाच्या आघाडीवर असलेल्या अमेरिकन राष्ट्राची मदत समानतेच्या भूमिकेवर झाली, तर ती पौर्वात्य राष्ट्रांना अधिक हिताची ठरणार आहे आणि अमेरिकाही ह्या संधीचा फायदा घेतल्याशिवाय रहाणार नाहीं अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. अशा परिस्थितींत ब्रिटननें सुचविलेला तृतीय पंथ निराळ्याच अर्थानें तृतीय पंथ ठरण्याचा संभवच अधिक दिसतो.

मि. बेव्हीन, मि. ॲटली आणि मि. चर्चिल ह्या तिघांच्याही भाषणांत सोव्हिएट रशिआचा उल्लेख येणें अपरिहार्यच होतें. पैकीं मि. ॲटली ह्यांचें भाषण सगळ्यांत अप्रबुद्ध होतें. ब्रिटिश कम्युनिस्ट पक्ष फारसा प्रभावी नसतांना एम. स्टॅलिन ह्यांना ब्रिटन कधीही कम्युनिस्ट होणार नसल्याची समज देण्यांत कांहींच हंशील नाहीं. मि. बेव्हिन आणि मि. चर्चिल ह्यांनीं केलेले रशियासंबंधीचे उल्लेख अधिक समर्पक आणि वस्तुस्थितीची दखल घेणारे होते. मध्यपूर्व ही ब्रिटनची आयुष्य रेषा आहे आणि युरोपवर कोणाही एका राष्ट्राचें प्राबल्य झाल्यास त्या रेषेला धोका पोचतो असें एक विधान त्यांनीं केलें आणि असें झाल्यास युद्धाचा संभव असल्याचेंही त्यांनीं बोलून दाखविलें. मध्यपूर्व आणि भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर असणारीं राष्ट्रें ह्यांना आज आर्थिक व राजकीय दृष्टीनें फार महत्व आलेलें आहे. कारण, जगाच्या मागासलेल्या खंडांतील वसाहतवजा राष्ट्रांना येथूनच प्रारंभ होतो. तेव्हां ह्या वसाहतीपासून आर्थिक दृष्ट्या अमेरिका आणि राजकीय दृष्ट्या सोव्हिएट रशिया दूर ठेवणें पाश्चिमात्य राष्ट्रगटाला आवश्यक वाटतें. मि. चर्चिल ह्यांच्या आजच्या परराष्ट्रीय धोरणांत व मजूर पक्षाच्या परराष्ट्रीय धोरणांत फारसा फरक नाहीं. अधिकारारूढ पक्ष ह्या नात्यानें मि. बेव्हिन किंचित् ताठरपणाची भाषा विशेषतः रशियाबाबत बोलत असले, तरी त्यांना खऱ्या परिस्थितीची जाणीव देण्याचें कार्य मि. चर्चिल करीत असतात असें म्हणतां येईल. व्यवहार म्हणून बोलशेव्हिक रशिआशीं मि. चर्चिल ह्यांनीं १९४१ च्या २२ जूनपासून पूर्वीचा द्वेष बाजूला ठेवून जमवून घेतलें. तीच भूमिका मजूर पक्षानें स्वीकारावी, असा योग्य इशारा मि. चर्चिल ह्यांनीं दिला आहे.

---

**चिनी डॉलरची किंमत उतरली**—चिनी सरकारनें आपल्या डॉलरची किंमत उतरविली आहे. २७ जानेवारीपर्यंत १,१५,००० चिनी डॉलरला १ अमेरिकन डॉलर मिळत असे; आतां त्यासाठीं १,२१,००० चिनी डॉलर द्यावे लागतील. अमेरिकन डॉलरची काळ्या बाजारांतील किंमत १,७०,००० चिनी डॉलर आहे.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें









## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विकी झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,१४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांचेवर |


चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का कर-माफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.



## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८








## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरीः–लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

–: शाखा :–


जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, जिरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर





## अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

# किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत ग. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें